<u>प्रेसनोट</u>

दि. ०२/३/२०२३

श्री.खंडोबा सहकारी मच्छीमारी संस्था मर्यादित,आरळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील चेअरमन श्री.सिताराम पाटलू पोवार,वय ४८ वर्षे रा.गोसावी गल्ली आरळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंध विभाग/घटक | कोल्हापूर घटक |
| गुन्हा नोंद कमांक | कोडोली पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथें गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| तकारदार | पुरूष वय ३५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नांव व कार्यालय | १.सिताराम पाटलू पोवार,वय ४८ वर्षे चेअरमन, श्री.खंडोबा सहकारी मच्छीमारी संस्था मर्यादित,आरळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर,रा.गोसावी गल्ली आरळे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १३०००/-रूपये |
| स्विकारलेली लाच रक्कम | १३०००/-रूपये |
| पडताळणी दिनांक | दि.०२/०३/२०२३ |
| सापळा दिनांक | दि.०२/०३/२०२३ |
| घटना घडलेचे ठिकाण | मौजे कसबा सातवे,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर. |

थोडक्यात माहिती :-

यातील तकारदार व त्यांचे भाऊ हे, श्री.खंडोबा सहकारी मच्छीमारी संस्था मर्यादित,आरळे,ता.पन्हाळा,जि. कोल्हापूर या संस्थेचे सभासद आहेत. तकारदार यांचे भाऊ यांचे मत्स व्यवसायाकरीता असलेले जाळे पूरामध्ये वाहून गेले असल्याने त्याचे नुकसान भरपाईचे शासनाचे अनुदान त्यांना मंजूर होवून मंजूर अनुदानाची रक्कम मत्स विभागामार्फत त्यांचे बॅक खातेवर जमा झाली आहे. सदर अनुदानाचा प्रस्ताव हा पंचनामा करून संस्थेमार्फत पाठवून अनुदान मंजूर होवून त्यांचे बॅक खातेवर जमा केल्याचा मोबदला म्हणून संस्थेचे चेअरमन लोकसवेक सीताराम पोवार यांनी लाचेची मागणी केलेबाबतची तकार ला.प्र.वि.कोल्हापूर येथे दिली होती.

सदर तकारीची पडताळणी केली असता संस्थेचे चेअरमन लोकसवेक सीताराम पोवार यांनी तकारदार यांचेकडे १३०००/- रूपये लाच मागणी करून ती लाच स्वत स्विकारलेनंतर त्यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे.त्यांचेवर कोडोली पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर गुन्हयाचा तपास ला.प्र.वि.कोल्हापूर येथील पोलीस निरीक्षक नितीन कुंभार हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त / पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे,ला.प्र.वि.पुणे परिक्षेत्र, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.सुरज गुरव,ला.प्र.वि.पुणे परिक्षेत्र तसेच श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकिय अधिकारी/ कर्मचारी, लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर कार्यालयास खालील नमूद कमांकावर संपर्क साधणेचे आव्हान मा.पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे,ला.प्र.वि.पुणे परिक्षेत्र यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री कमांक १०६४

२) ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर दुरध्वनी कमांक ०२३१/२५४०९८९.

३)श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५

४)ईमेल आयडी कोल्हापूर dyspacbkolapur@gmail.com/www-acbmaharashtra.gov.in

**( नितीन कुंभार )**
**पोलीस निरीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हा**